मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com
» पुणे, पिंपरी-चिंचवड
» शनिवार, दि. 16 मे 2026 | पान- 1

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत महापौर रवि लांडगे यांचा सायकलने प्रवास

## इंधन बचत व पर्यावरणपूरक जीवनशैलीचा दिला नागरिकांना संदेश..



**पिंपरी | प्रतिनिधी**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंधन बचत आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीबाबत केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे महापौर रवि लांडगे यांनी आज आपल्या निवासस्थानापासून महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीपर्यंत सायकलने प्रवास केला. यावेळी महापौर रवि लांडगे यांनी नागरिकांनाही शक्य तिथे सायकलचा वापर, सार्वजनिक वाहतूक आणि इंधन बचतीच्या सवयी अंगीकारण्याचे आवाहन केले.

सकाळी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे रवि लांडगे हे आपल्या निवासस्थानातून सायकलवरून महापालिकेकडे रवाना झाले. शहरातील प्रमुख मार्गांवरून सायकलने प्रवास करत त्यांनी नागरिकांना इंधन बचत, पर्यावरण संरक्षण आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश दिला. यावेळी महापालिकेचे सह शहर अभियंता बापू गायकवाड, उप अभियंता अमित दीक्षित, महापौरांचे स्वीय सहाय्यक अभय चौगुले, संदीप पालांडे हे देखील त्यांच्यासमवेत होते.

महापौर रवि लांडगे म्हणाले, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या इंधन बचत आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीच्या संदेशातून प्रेरणा घेत आजचा हा सायकल प्रवास करण्यात आला आहे. येथून पुढे आठवड्यातून एक दिवस सायकलने प्रवास करण्याचे नियोजन आहे. तसेच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर नागरिकांनीही दैनंदिन जीवनात सायकलचा वापर, सार्वजनिक वाहतूक आणि इंधन बचतीच्या सवयी अंगीकारून पर्यावरण रक्षणासाठी योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

सायकलचा वापर हा केवळ इंधन बचतीसाठी नाही, तर निरोगी जीवनशैली, स्वच्छ हवा आणि पर्यावरण संवर्धनासाठीही महत्त्वाचा आहे. इंधन बचत हीच खरी राष्ट्रसेवा असून, पर्यावरणाचे संरक्षण आणि पुढील पिढ्यांसाठी सुरक्षित भविष्य घडवण्यासाठी प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात छोटे-छोटे सकारात्मक बदल करणे आवश्यक आहे. पर्यावरणपूरक पिंपरी चिंचवड घडविण्यासाठी प्रत्येकाने छोट्या-छोट्या सवयींमधून योगदान देण्याची गरज आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका हरित उपक्रम, पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत विकासासाठी विविध मोहिमा राबवत असून, नागरिकांनीही या उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन देखील यावेळी महापौर रवि लांडगे यांनी केले.

# पीएम श्री माध्यमिक विद्यालय थेरगावच्या 25 गुणवंत विद्यार्थ्यांना मनपाकडून रोख बक्षिसं

## श्वेता अचमलवाड विद्यालयात पहिली, विद्यार्थ्यांनी दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागांतर्गत असलेल्या थेरगाव येथील 'पीएम श्री माध्यमिक विद्यालय' या विद्यालयातील २५ विद्यार्थ्यांनी दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे.

महानगरपालिकेच्या वतीने विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांना रोख स्वरुपात बक्षीस देऊन गौरविण्यात येते. या अंतर्गत ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या ३ विद्यार्थ्यांना प्रत्येकी एक लाख रुपये, ८५ टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या ९ विद्यार्थ्यांना प्रत्येकी ५० हजार रुपये आणि ८० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या १३ विद्यार्थ्यांना प्रत्येकी २५ हजार रुपयांचे रोख बक्षीस जाहीर झाले आहे.

या विद्यालयातून श्वेता अचमलवाड हिने ९३.४० टक्के गुण मिळवून प्रथम येण्याचा बहुमान मिळवला, तर आविष्कार घोगरे याने ९२.२० टक्के गुणांसह द्वितीय आणि आरती गंधले हिने ९१.८० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला. या तिन्ही विद्यार्थ्यांना प्रत्येकी एक लाख रुपयांचे पारितोषिक मिळणार आहे. एकूण २५ विद्यार्थी या रोख बक्षिसासाठी पात्र ठरल्याने विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. या घवघवीत यशाबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. बाबासाहेब राठोड, पर्यवेक्षक श्रीमती मंजुषा टिळेकर आणि सर्व शिक्षकांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे, त्यांच्या पालकांचे आणि त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे अभिनंदन केले असून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# पिंपरी-चिंचवडमध्ये RMC प्लॅट्स नियमावलीसाठी जनसुनावणी घ्या!

## पिंपरी-चिंचवड हौसिंग सोसायटी फेडरेशनची मागणी, मुख्यमंत्री, विभागीय आयुक्त, मनपा आयुक्तांना निवेदन

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहर व उपनगरांमध्ये वाढत्या प्रमाणात सुरू असलेल्या रेडी मिक्स काँक्रीट (RMC) प्लॅंट्समुळे होणाऱ्या धुळीच्या प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी तातडीने कडक नियमावली (SOP) तयार करावी, तसेच सार्वजनिक जनसुनावणी आयोजित करावी, अशी मागणी पिंपरी-चिंचवड को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी फेडरेशनतर्फे करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विभागीय आयुक्त, पुणे जिल्हाधिकारी, पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त, पीएमआरडीए आयुक्त आणि पोलीस आयुक्त यांना पाठवण्यात आलेल्या निवेदनात शहरातील वाकड, पुनावळे, ताथवडे, किवळे आणि रावेत या झपाट्याने विकसित होणाऱ्या निवासी भागांमध्ये हवेतील धुळीचे प्रमाण धोकादायक पातळीवर पोहोचल्याचे नमूद करण्यात आले आहे.



### या पार्श्वभूमीवर पुढील मागण्या करण्यात आल्या आहेत

- सर्व RMC प्लॅट्सना पूर्णतः ‘डस्ट-फ्री टेक्नॉलॉजी’ बंधनकारक करणे
- धुळीचे कण नियंत्रित करण्यासाठी सेडिमेंटरी चेंबर्स व आधुनिक फिल्टरेशन प्रणालीचा वापर
- महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमांचे काटेकोर पालन व नियमित ऑडिट
- निवासी भागांपासून प्लॅट्ससाठी सुरक्षित अंतर निश्चित करणे
- RMC टँकर वाहतुकीसाठी निश्चित वेळापत्रक व नियमांचे उल्लंघन झाल्यास कडक दंड
- नियमभंग करणाऱ्या प्लॅट्सवर परवाना रद्द किंवा सील करण्याची कारवाई
- नागरिकांसाठी स्वतंत्र तक्रार निवारण यंत्रणा किंवा हेल्पलाइन सुरू करणे

निवेदनात म्हटले आहे की, RMC प्लॅट्सच्या कार्यपद्धतीत स्पष्ट नियमावलीचा अभाव असल्याने अनेक ठिकाणी मनमानी पद्धतीने कामकाज सुरू आहे. यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असून विशेषतः लहान मुले व ज्येष्ठ नागरिक श्वसनाच्या आजारांनी त्रस्त होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या मुद्द्यांवर नागरिकांचे मत जाणून घेण्यासाठी सार्वजनिक जनसुनावणी घेण्यात यावी, अशी ठाम मागणीही करण्यात आली आहे. सर्व भागधारकांच्या सहभागातून पर्यावरणपूरक आणि पारदर्शक नियमावली तयार करावी, असे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. दरम्यान, या मागणीमुळे पिंपरी-चिंचवड परिसरातील पर्यावरण व नागरी आरोग्य विषय पुन्हा एकदा चर्चेत आला असून प्रशासन काय भूमिका घेते याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

> “पिंपरी-चिंचवड शहरात मोठ्या प्रमाणावर वाढत असलेल्या RMC प्लॅट्समुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. विशेषतः वाकड, पुनावळे, ताथवडे, किवळे आणि रावेत या भागांमध्ये धुळीचे प्रदूषण चिंताजनकरीत्या वाढले आहे. या प्लॅट्ससाठी स्पष्ट आणि कडक SOP नसल्यामुळे मनमानी कारभार सुरू आहे. त्यामुळे सर्व RMC प्लॅट्सना ‘डस्ट-फ्री टेक्नॉलॉजी’ बंधनकारक करणे, प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमांची काटेकोर अंमलबजावणी करणे आणि नागरिकांच्या सहभागातून पारदर्शक जनसुनावणी घेणे अत्यंत आवश्यक आहे. नागरिकांचे आरोग्य आणि पर्यावरण सुरक्षित ठेवण्यासाठी प्रशासनाने तातडीने ठोस पावले उचलावीत.
>
> - सचिन लोंढे, पिंपरी-चिंचवड को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी फेडरेशन.



# भाजपच्या उधळपट्टीच्या विरोधात राष्ट्रवादीचे नगरसेवक थेट बैलगाडीतून महापालिकेत

## राष्ट्रवादीच्या नगरसेविका स्वाती काटे, प्रतीक्षा जवळकर, नगरसेवक राजू बनसोडे हे बैलगाडीतून महापालिकेत दाखल झाले.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पंतप्रधानांच्या काटकसरीच्या आवाहनाचा आधार घेत अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या तीन नगरसेवकांनी शुक्रवारी (दि.15) थेट बैलगाडीतून पिंपरी-चिंचवड महापालिका भवनात प्रवेश करत सत्ताधारी भाजपवर जोरदार निशाणा साधला. एका बाजूला देशहितासाठी खर्चाला लगाम घालण्याची भाषा केली जाते, तर दुसऱ्या बाजूला महालिकेत पदाधिकाऱ्यांच्या सुविधा, दौरे आणि सुरक्षेवर कोट्यवधींची उधळपट्टी सुरू असल्याचा आरोप करत, तसेच, इंधन दरवाढीच्या विरोधात राष्ट्रवादीने अनोखे आंदोलन केले.



महापालिकेच्या सर्वसाधारण सभेसाठी दापोडी, कासारवाडी प्रभाग क्रमांक 30 मधील राष्ट्रवादीच्या नगरसेविका स्वाती काटे, प्रतीक्षा जवळकर, नगरसेवक राजू बनसोडे हे बैलगाडीतून महापालिकेत दाखल झाले. पारंपरिक वेशभूषा, घोषणाबाजी आणि बैलगाडीच्या माध्यमातून करण्यात आलेल्या या आंदोलनाने महापालिका परिसरात मोठी उत्सुकता निर्माण झाली.

नगरसेवकांनी भाजपवर थेट टीका करत, पंतप्रधानांनी देशातील लोकप्रतिनिधींना काटकसर करण्याचे आवाहन केले आहे. मात्र महापालिकेत त्याच्या नेमके उलट चित्र दिसत आहे. आर्थिक परिस्थिती डळमळीत असल्याचे सांगितले जाते, पण दुसरीकडे पदाधिकाऱ्यांच्या सुरक्षेसाठी लाखो रुपये, परदेश दौरे, सुशोभिकरण आणि अनावश्यक खर्च सुरूच आहेत.

महापालिकेतील अलीकडील काही निर्णयांचा उल्लेख करत राष्ट्रवादीने भाजपच्या कारभारावर दिखाऊ विकास आणि प्रसिद्धीचा हव्यास अशी टीका केली. सामान्य नागरिकांना पाणी, रस्ते, वाहतूक आणि आरोग्य सुविधा यांसारख्या मूलभूत प्रश्नांना सामोरे जावे लागत असताना, सत्ताधारी मात्र जनतेच्या पैशांवर ऐशोआराम करत असल्याचा आरोपही करण्यात आला.

# पुणेकरांना दोन महिन्यात मिळणार समान पाणी! महापौरांनी दिले आदेश

## शहरातील 'समान पाणीपुरवठा योजने'ची प्रलंबित कामे दोन महिन्यांत पूर्ण करण्याचे आदेश महापौर मंजूषा नागपुरे यांनी दिले आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील विविध भागांत सुरू असलेल्या समान पाणीपुरवठा योजनेतील प्रलंबित कामे पुढील दोन महिन्यांत पूर्ण करा. शहरात टँकर पॉइंटसाठी नवीन जागा घेऊन टँकर पुरवठ्यात सुधारणा करावी, महापालिकेच्या इमारतींमध्ये रेन वॉटर हार्वेस्टिंग प्रकल्प राबवावेत. तलावातील गाळ काढण्याचे काम पालिकेच्याच यंत्रणेमार्फत प्रभावीपणे करावे,' अशा सूचना महापौर मंजूषा नागपुरे यांनी प्रशासनाला केल्या.

महापालिकेच्या वतीने शहरात सुरू असलेल्या विविध विकासकामांचा तसेच प्रलंबित कामांचा महापौर नागपुरे यांनी आढावा घेण्यासाठी बैठक घेतली. महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख या वेळी उपस्थित होते.

'शहरात भटक्या श्वानांची समस्या गंभीर होत असून, याकडे लक्ष द्यावे. भटक्या श्वानांसाठी शेल्टरबरोबरच त्यांच्यावर उपचार करण्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. शहरात प्राणी उपचार केंद्र स्थापन करावे. पाळीव प्राण्यांसाठी 'डॉग पार्क' विकसित करावे.

महापालिकेच्या अर्थसंकल्पात डॉग पार्क उभारण्यासाठी निधीची तरतूद केली. भटक्या कुत्र्यांच्या त्रासामुळे सर्वच भागातील नागरिक त्रस्त झाले असून लहान मुले तसेच सकाळी फिरण्यासाठी घराबाहेर पडणाऱ्या जेष्ठ नागरिकांना देखील भटक्या कुत्र्यांच्या समस्याला तोंड द्यावे लागत असल्याचे समोर आले आहे.

डुकरांच्या नियंत्रणासाठी पुणे महापालिकेच्या वतीने नियुक्त करण्यात आलेल्या एजन्सींचे संपर्क क्रमांक सार्वजनिक करावेत. जेणेकरून नागरिकांना संपर्क साधण्यामध्ये कोणतीही अडचण येणार नाही. सर्व क्षेत्रीय कार्यालयांसाठी शववाहिका (पुष्पक) उपलब्ध करून द्याव्यात,' अशा सूचना महापौरांनी बैठकीत केल्या. पुष्पक वाहनांची मागणी होत असते. त्यासाठी आवश्यक ती पावले महापालिका प्रशासनाकडून उचलण्यात यावी, अशी अपेक्षा देखील त्यांनी व्यक्त केली.



### पाणीपुरवठा योजनांना गती

» पुणे शहरातील समान पाणीपुरवठा योजनेतील प्रलंबित कामे पुढील दोन महिन्यांत पूर्ण करण्याच्या सूचना महापौर मंजूषा नागपुरे यांनी प्रशासनाला दिल्या. शहरात टँकर पुरवठा अधिक सक्षम करण्यासाठी नवीन टँकर पॉइंट उभारणे, महापालिकेच्या इमारतींमध्ये रेन वॉटर हार्वेस्टिंग प्रकल्प सुरू करणे तसेच तलावातील गाळ काढण्याची कामे पालिकेच्या यंत्रणेमार्फत प्रभावीपणे करण्यावर भर देण्यात आला. वाढत्या उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरात पाणीटंचाई निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाने नियोजनबद्ध उपाययोजना कराव्यात, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### आरोग्य व अतिक्रमण प्रश्नांवर भर

» महापालिकेची प्रसूतिगृहे, सर्वसाधारण रुग्णालये आणि एनआयसीयू अद्ययावत करण्याची कामे पुढील सहा महिन्यांत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. लायगुडे दवाखान्याचे आधुनिकीकरण तसेच शहरी गरीब योजनेअंतर्गत रुग्णालयांना वेळेवर देयके मिळण्यासाठी पारदर्शक यंत्रणा उभारण्याचे निर्देश महापौरांनी दिले. पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर पालखी मार्गावरील अतिक्रमणे हटविण्यासाठी विशेष मोहीम राबवावी, तसेच आवश्यकतेनुसार सुरक्षा रक्षकांची संख्या वाढवून तीन पाळ्यांमध्ये नेमणुका कराव्यात, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### भटक्या श्वानांवर उपाययोजना

» शहरातील भटक्या श्वानांच्या वाढत्या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देण्याच्या सूचना महापौरांनी बैठकीत केल्या. नागरिक, विशेषतः लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे त्यांनी नमूद केले. भटक्या श्वानांसाठी शेल्टर उभारणे, उपचार केंद्र सुरू करणे आणि पाळीव प्राण्यांसाठी 'डॉग पार्क' विकसित करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले. याशिवाय डुकरांच्या नियंत्रणासाठी नियुक्त एजन्सींचे संपर्क क्रमांक सार्वजनिक करण्यास सांगण्यात आले. शहरातील स्वच्छता आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी तातडीने कार्यवाही करावी, असे आदेशही देण्यात आले.

# स्वारगेट ते कात्रज मेट्रोच्या कामाला वेग; बोगद्यासाठीच्या काँक्रीट सेगमेंट कास्टिंगचा श्रीगणेशा

## महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांच्या हस्ते वाघोली येथील कास्टिंग यार्डमध्ये या कामाचा प्रारंभ झाला.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे मेट्रोच्या टप्पा-१ विस्तारीकरणांतर्गत अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या 'स्वारगेट ते कात्रज' या भूमिगत मार्गाच्या कामात आता मोठी प्रगती झाली आहे. या ५.४४ किलोमीटर लांबीच्या मार्गावरील बोगद्यांच्या बांधकामासाठी लागणाऱ्या 'काँक्रीट सेगमेंट'च्या कास्टिंग कामाला (CASTING WORK) आजपासून सुरुवात करण्यात आली आहे. महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांच्या हस्ते वाघोली येथील कास्टिंग यार्डमध्ये या कामाचा प्रारंभ झाला.

भूमिगत मेट्रोसाठी जेव्हा 'टनेल बोअरिंग मशीन' (TBM) द्वारे बोगदा तयार केला जातो, तेव्हा त्याला आतून आधार देण्यासाठी काँक्रीटचे रिंग सेगमेंट्स बसवले जातात. या एका रिंगमध्ये ६ ते ८ सेगमेंट्स असतात. स्वारगेट ते कात्रज या संपूर्ण ५.४४ किमीच्या प्रवासासाठी हजारो सेगमेंट्सची गरज भासणार आहे. या कास्टिंग यार्डमध्ये एकाच वेळी अनेक सेगमेंट्स तयार करण्याची क्षमता आहे, ज्यामुळे कामाला गती मिळणार आहे.

सध्या स्वारगेट ते कात्रज या पट्ट्यात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते. मेट्रो सुरू झाल्यानंतर हा प्रवास केवळ १० ते १२ मिनिटांत पूर्ण करणे शक्य होईल. "कास्टिंग सेगमेंटचे काम सुरू होणे हा प्रकल्पाचा एक तांत्रिकदृष्ट्या महत्त्वाचा टप्पा आहे. लवकरच स्वारगेट येथून टीबीएम मशीनच्या सहाय्याने बोगद्याचे प्रत्यक्ष खोदकाम सुरू होईल," अशी माहिती श्रावण हर्डीकर यांनी यावेळी दिली.

यावेळी महामेट्रोचे संचालक (प्रकल्प) अतुल गाडगीळ आणि इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. महामेट्रोने २०२७ पर्यंत हा मार्ग प्रवाशांसाठी खुला करण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवले आहे.



### प्रकल्पाची ठळक वैशिष्ट्ये

» मार्ग: हा संपूर्ण मार्ग पूर्णपणे भूमिगत असून 'स्वारगेट-गुलटेकडी-मार्केट यार्ड-पुणे इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी-कात्रज' असा असणार आहे.

» स्थानके: या मार्गावर एकूण तीन महत्त्वाची भूमिगत स्थानके प्रस्तावित आहेत.

» खर्च: या विस्तारीकरणासाठी ३,६६८ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून केंद्र आणि राज्य सरकारकडून याला आधीच मंजुरी मिळाली आहे.

# पुण्यातील ‘नदीकाठ सुधार’ साठी मिळाल्या मोफत जागा !

## केंद्र सरकारच्या राष्ट्रीय नदी संवर्धन योजनेअंतर्गत पुणे शहरातील मुळा- मुठा नदीकाठ सुधारणा योजना राबविली जात आहे

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असलेल्या मुळा- मुठा नदीकाठ सुधार योजनेसाठी राज्य सरकारने तीन जागा मोफत देण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे या प्रकल्पाच्या कामाला गती मिळणार आहे. औंध, येरवडा आणि संगमवाडी या भागातील जागांचा यामध्ये समावेश आहे.

केंद्र सरकारच्या राष्ट्रीय नदी संवर्धन योजनेअंतर्गत पुणे शहरातील मुळा- मुठा नदीकाठ सुधारणा योजना राबविली जात आहे. या प्रकल्पाचे काम गेल्या काही वर्षांपासून सुरू आहे. यामध्ये नदीचे रूप बदलले जाणार आहे. नदीत सोडले जाणारे मैलापाणी प्रक्रिया करून नदीत सोडले जावे. यामुळे होणारे पाण्याचे प्रदूषण कमी व्हावे, यासाठी ‘जायका’ या संस्थेच्या सहकार्यातून या प्रकल्पांतर्गत ११ मैलापाणी शुद्धीकरण केंद्र (एसटीपी) उभारण्यात येत आहेत.

या ११ प्रकल्पांपैकी १० प्रकल्पांची कामे महापालिकेच्या वतीने सुरू करण्यात आली आहेत. या प्रकल्पांमुळे दररोज सुमारे ३९६ दशलक्ष लिटर (एमएलडी) सांडपाण्यावर प्रक्रिया करता येणार आहे. नदीकाठ सुधार योजनेत रस्तादेखील केला जाणार आहे. यासाठी राज्य सरकार तसेच खासगी जागामालकांच्या जागा ताब्यात घ्याव्या लागणार आहेत.

यासाठी राज्य सरकारची औंध, येरवडा, संगमवाडी येथील जागांची महापालिकेला आवश्यकता होती. त्यासाठी राज्य सरकारने महापालिकेकडे आर्थिक मोबदला मागितला होता. परंतु, महापालिकेने या जागा विनामोबदला मिळाव्यात अशी भूमिका घेतली होती.

मंत्रिमंडळाच्या बैठकीत या सर्व जागा महापालिकेला मोफत देण्याचा निर्णय झाला आहे. यामुळे महापालिकेची सुमारे ११५ कोटी रुपये वाचणार आहेत. या बाबत अधिक माहिती देताना महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर म्हणाल्या, ‘औंध भागातील सर्व्हे नंबर २५, बोटॅनिकल गार्डन येथील ३० गुंठे जागा ताब्यात मिळत नव्हती. तीन वर्षांपासून महापालिकेचे प्रयत्न सुरू होते. ही जागा मिळत नसल्याने १० एमएलडी क्षमतेचा मैलापाणी शुद्धीकरण केंद्राचे काम प्रत्यक्ष जागेवर सुरू होऊ शकले नव्हते.’

या बोटॅनिकल गार्डन मैलापाणी शुद्धीकरण केंद्रासाठी आवश्यक असलेल्या जमीन हस्तांतरणाच्या प्रस्तावाला कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी स्वाक्षरी करून मंजुरी दिली. त्यामुळे प्रकल्पाच्या पुढील अंमलबजावणीस गती मिळाली आहे. याचप्रमाणे महिला बालकल्याण विभागाची येरवडा येथील सुमारे ७ हजार चौरसमीटर जागा, तसेच संगमवाडी येथील सुमारे ११ हजार चौरस मीटर जागाही महापालिकेला मिळणार असल्याचे अतिरिक्त आयुक्त कौर यांनी सांगितले.



### सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाला चालना

» **औंध येथील बोटॅनिकल गार्डन परिसरातील ३० गुंठे जागा मिळत नसल्यामुळे १० एमएलडी क्षमतेच्या मैलापाणी शुद्धीकरण केंद्राचे काम रखडले होते. मात्र, राज्य सरकारने जमीन हस्तांतरणास मंजुरी दिल्यानंतर आता या प्रकल्पाची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू होणार आहे. याशिवाय येरवडा आणि संगमवाडी येथील महत्त्वाच्या जागाही महापालिकेला उपलब्ध होणार असल्याने नदीकाठ सुधारणा, रस्ते आणि सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांना मोठी मदत मिळणार आहे.**

### मुळा-मुठा नदीकाठ सुधार योजनेला गती

» **पुणे महापालिकेच्या महत्त्वाकांक्षी मुळा-मुठा नदीकाठ सुधार योजनेसाठी राज्य सरकारने औंध, येरवडा आणि संगमवाडी येथील तीन जागा विनामूल्य देण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे महापालिकेचे सुमारे ११५ कोटी रुपये वाचणार असून प्रकल्पाच्या कामांना गती मिळणार आहे. केंद्र सरकारच्या राष्ट्रीय नदी संवर्धन योजनेअंतर्गत हा प्रकल्प राबविला जात असून, नदी प्रदूषण कमी करण्यासाठी ‘जायका’ च्या सहकार्याने ११ मैलापाणी शुद्धीकरण केंद्रे उभारली जात आहेत.**

### तीन जागा महापालिकेच्या ताब्यात

» **औंध भागातील सर्व्हे नंबर २५, बोटॅनिकल गार्डन येथील ३० गुंठे जागा**
» **येरवडा येथील सुमारे ७ हजार चौरसमीटर जागा**
» **संगमवाडी येथील सुमारे ११ हजार चौरस मीटर जागा**

# पालखीमार्गाचे काम 80 टक्के पूर्ण; गडकरी यांनी ताफ्यातील गाड्या कमी करून केली बसमधून पाहणी

## वारकऱ्यांना कोणताही त्रास होऊ नये, यासाठी मुख्य रस्त्यासोबतच साडेतीन मीटरची स्वतंत्र ‘पालखी लेन’ आणि सर्व्हिस रोड तयार करण्यात आला

**पुणे | प्रतिनिधी**

संत ज्ञानेश्वर महाराज पालखीमार्गाच्या कामाची पाहणी करण्यासाठी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्गमंत्री नितीन गडकरी गुरुवारी (दि. 14) पुण्यात आले होते. या वेळी त्यांनी ताफ्यातील गाड्या कमी करून पत्रकारांसोबत बसमधून प्रवास करत प्रत्यक्ष कामाची पाहणी केली.

पालखीमार्गाचे 80 टक्के काम पूर्ण झाले असून, येत्या सहा महिन्यांत हा संपूर्ण मार्ग भाविकांच्या सेवेत रुजू होईल, असा विश्वास गडकरी यांनी व्यक्त केला.बस प्रवासादरम्यान पत्रकारांशी संवाद साधताना नितीन गडकरी म्हणाले की, वारकऱ्यांची श्रद्धा असलेल्या या मार्गासाठी 12 हजार कोटी रुपये खर्च केले जात आहेत.

वारीच्या काळात वारकऱ्यांना कोणताही त्रास होऊ नये, यासाठी मुख्य रस्त्यासोबतच साडेतीन मीटरची स्वतंत्र ‘पालखी लेन’ आणि सर्व्हिस रोड तयार करण्यात आला आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अस्मितेचे प्रतीक असलेला हा मार्ग वारकऱ्यांसाठी सुखाचा आणि आनंददायी ठरेल.

तसेच, राज्य महामार्गांचे राष्ट्रीय महामार्गात रूपांतर करून आम्ही महाराष्ट्रात 5 ते 6 लाख कोटींची कामे मार्गी लावली आहेत. पालखीमार्गामुळे वाहतूक कोंडी आणि प्रदूषणातूनही नागरिकांची सुटका होईल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

पालखी मार्गाच्या दुतर्फा सुमारे 50 हजार झाडे लावली जात असून, 450 जुन्या झाडांचे यशस्वी पुनर्रोपण करण्यात आले आहे. हा मार्ग फक्त रस्ता नसून तो वारकऱ्यांच्या इतिहासाची आणि श्रद्धेची साक्ष देणारा एक हरित कॉरिडॉर ठरेल. झाडांच्या हिरवेपणामुळे वारकऱ्यांचा विठ्ठलभेटीचा प्रवास अधिक सुखकर होईल, असेही गडकरींनी नमूद केले.



### इथेनॉलवरील गाडी करणार लॉन्च

» **देशातील वाढत्या इंधन दरांवर भाष्य करताना गडकरींनी पर्यावरणपूरक पर्यायांवर भर दिला. आपल्या देशाला 87 टक्के इंधन आयात करावे लागते. आता आपल्याला आत्मनिर्भर व्हायचे असेल, तर पेट्रोल-डिझेलला पर्याय शोधणे गरजेचे आहे. आपला शेतकरी आता फक्त अन्नदाता नाही, तर तो ऊर्जादाता आणि इंधनदाता बनत आहे. येत्या 4 तारखेला मी 100 टक्के इथेनॉलवर चालणारी मारुती सुझुकीची गाडी लॉंच करणार आहे, अशी महत्त्वपूर्ण घोषणाही त्यांनी यावेळी केली.**